संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# मिजास मिरवणारा फळांचा राजा

यंदा अधिक महिना आल्याने फळांचा राजा असलेल्या आंब्याच्या खरेदी विक्रीला नेहमीपेक्षा जास्त प्रतिसाद मिळतो आहे. दरवर्षी केवळ महाराष्ट्रात तब्बल पाचशे कोटी रुपयांची उलाढाल या आंबा व्यापारात होते. एवढेच नव्हे तर जागतिक बाजारपेठेत महाराष्ट्राच्या हापूस आणि केशर आंब्याला मोठी मागणी असते. त्यामधूनसुद्धा वेगळे तीनशे ते चारशे कोटी रुपयांचे परकीय चलन उपलब्ध होत असते. यंदाच्या आंब्याच्या उलाढालीने नवा उच्चांक गाठला असून, महाराष्ट्रातलीच उलाढाल थेट हजार कोटीपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. याची दोन कारणे प्रामुख्याने समोर येतात एक म्हणजे यंदा आलेला अधिक महिना आणि आंबा उत्पादकांनी बाजारपेठा किंवा मध्यस्थांना टाळून थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचा निवडलेला मार्ग त्यांना अधिक लाभ करून देणारा ठरला आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाईन मार्केटिंगने आंब्याला अधिक चांगले दिवस आल्याचे मानले जाते आहे. आंबा हा फळांचा राजा आहेच. परंतु आता कमी कालावधीत सर्वाधिक आर्थिक उलाढाल करण्याचा विक्रमही आंब्याकडून नोंदला जाणार आहे. परदेशामध्येसुद्धा जवळपास तेवीस हजार टन आंबा जगातल्या चाळीस देशांपर्यंत पोहोचतो. यातला आणखी एक दखल घेण्यासारखा भाग म्हणजे गेल्या काही वर्षात आंबा निर्यातीत एकट्या महाराष्ट्राचा साठ टक्के वाटा आहे. याबरोबरच संपूर्ण देशभरात आंब्याच्या शंभर ते दीडशे वेगवेगळ्या जाती उत्पादित होत असतात. यामध्ये दशहरी, तोतापुरी, मालदा, रासपरी, चौसा, लंगडा, बदामी अशा एक ना अनेक जातींची भर पडलेली आहे. भारतात उत्पादित होणारा आंबा हा जगाचेही लक्ष वेधून घेणारा ठरला असल्याने साधारणपणे जानेवारी ते जूनपर्यंत आंबा विक्री किंवा व्यापाराची मोठी उलाढाल होते. थोड्या कालावधीत काही हजार कोटींची विक्री घडून येते. काही वर्षातल्या कृषीक्षेत्रातल्या संशोधनानेसुद्धा आता आंबा लागवडीला उत्तेजन मिळालेले आहे. कमी कालावधीत फळ देणारी आंब्याची रोपं लावली जातात. आणि वर्ष-दोन वर्षातच उंचीला छोट्या असलेल्या या आंब्याच्या झाडांपासून चांगले मोठे गोड आंबे उपलब्ध होतात.

### यंदा विक्रमी विक्री

मार्च महिना आला की, हापूस आंब्याची मोठ्या प्रमाणावर आवक होते. विशेष म्हणजे आता वाशी मार्केटपेक्षाही वेगवेगळ्या ठिकाणी आंब्यांची दुकानं किंवा आंबा महोत्सव भरवले जातात. आणि त्यातून मोठी मागणी निर्माण होते आहे. मार्च महिन्याच्या सुरुवातील जवळपास पाच हजार रुपये डझन असा दणदणीत भाव हापूस आंब्याला मिळाला होता. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, देवगड या ठिकाणीदेखील मोठ्या प्रमाणावर आंब्याचा हंगाम दणदणीतपणे साजरा झालेला आहे. रासायनिक प्रक्रियेद्वारे तयार केलेल्या आंब्यांचा भाव आणि थेट झाडावरच पिकवलेल्या आंब्याला जास्त भाव मिळतो. कोकणाची हापूस आंब्यातली मक्तेदारी अजूनही कायम आहे. उत्तम दर्जाच्या आंब्याला चांगला भाव मिळतोच. त्यामध्येसुद्धा ग्रेड ठरलेली असते. बऱ्याच ठिकाणी व्यापारी आणि आंबा उत्पादक शेतकरी यांचे आधीच करार झालेले असतात. आंब्याचे संभाव्य उत्पादन लक्षात घेऊन त्या तुलनेमध्ये उत्पादकाला आगाऊ रक्कमही दिली जाते. कोकणात तर पाच पाच हजार पेटी आंबा उत्पादन करणाऱ्यांना पाच ते दहा लाखांचे अॅडव्हान्स पेमेंटही केले जात असते. या हंगामात विकल्या जाणाऱ्या आंब्यात जवळपास पंधरा टक्के आंबा हा कॅनिंगसाठी म्हणजेच आंब्यापासून बनणाऱ्या वेगवेगळ्या पदार्थांसाठी वापरला जातो. मग आंब्यापासूनचा पल्प किंवा डबाबंद रस, आंब्याचा जाम, आंबाचटणी, आंबापोळी, आंबावडी, शिवाय इतरही पदार्थ बनवून ते वर्षभर विकले जातात. विशेष म्हणजे अलिकडच्या काळात शुगर फ्री आंबादेखील उपलब्ध होऊ लागला आहे. आणि त्यालादेखील बरीच मोठी बाजारपेठ मिळते आहे. भारत तर मधुमेह म्हणजेच डायबेटिस झालेल्यांची जागतिक राजधानी होते आहे. अशा मधुमेही लोकांसाठी आंब्याची तहान भागवण्याकरीता हे शुगर फ्री आंबे वरदान ठरल्यासारखी स्थिती आहे. पूर्वी तर बाजारामध्ये विशिष्ट हंगामातच आंबा मिळत असे. परंतु आता वर्षभर आंबा उपलब्ध होतो. आणि परदेशातही पाठवला जातो. अर्थातच उत्पादित होणाऱ्या आंब्यापैकी पाच टक्के आंबा हा वाया जात असतो. ते नुकसान गृहित धरून काही ठिकाणी अशा कच्च्या आंब्यांचाही आमरसाचा स्क्वॅश तयार करण्यासाठी उपयोग होतो.

### आंबा खाणाऱ्यांची राजधानी

असे म्हटले जाते की, एकूण जगाच्या तुलनेत सत्तर टक्के आंबा भारतात पिकतो. आणि मेक्सिको पाठोपाठ भारताचा निर्यातीमध्ये नंबर लागतो. भारताचे राष्ट्रीय फळ म्हणूनही आंब्याला मान आहे. आर्थिक किंवा व्यावसायिक दृष्टीकोनाशिवाय आंब्याचे शारीरिकदृष्ट्या असलेले उपयोगही खूप महत्त्वपूर्ण असल्याने या विशिष्ट हंगामामध्ये केले जाणारे आंब्याचे सेवन हे पित्त कमी करणारे आणि कॅल्शिअम वाढवणारे असल्याचे म्हटले जाते. या काळातल्या सगळ्या भारतीय सणांमध्ये आंब्याला अग्रस्थान मिळते. वेगवेगळ्या देवळांमध्ये आंब्याची आरास करून त्या त्या ठिकाणचे भक्त आपापली श्रद्धा व्यक्त करीत असतात. धार्मिक कार्यात आंब्याची पानं सर्वाधिक शुभ मानली जातात. आणि म्हणूनच आंबादेखील शारीरिक मानसिक आणि आर्थिकदृष्ट्यासुद्धा शुभकारकच ठरत आलेला आहे. थोड्या काळासाठी का असेना परंतु फळांचा हा राजा आपली मिजास मिरवून जातो. आणि आंब्यासाठी सगळेच खवय्ये किंवा आंबाभक्त या राजाचे गुलाम होणेच पसंत करतात. भारतात आबालवृद्धांपासून सर्वांना असलेले आंब्याचे वेड हासुद्धा एक जागतिक विक्रमाचाच भाग ठरू शकतो. कारण जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या भारतात आंबा खाणाऱ्यांची सर्वाधिक संख्या आहे म्हणजे भारत ही आंबा भक्तांचीदेखील राजधानी म्हणता येते. यातून मिळणारा रोजगारही तितकाच महत्त्वपूर्ण असल्याने या आंबा बागांची किंवा आमराईची तशी वर्षभर निगा ठेवावी लागत असते. सुदैवाने यावर्षी कोकणात अवकाळी पाऊस किंवा वादळी पाऊस फारसा आलेला नाही. म्हणूनच यावेळचे आंबा उत्पादन नेहमीपेक्षा थोडे जास्त झाले आहे.